




दैनिक **युवावार्ता**

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ७० । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । २२/०३/२०२६ । पाने - ६







# सिलेंडर टंचाईने संगमनेर त्रस्त; संतप्त नागरिक रस्त्यावर



**सध्या केवळ घरगुती गॅस पुरवठाच विस्कळित झाला नसून व्यावसायिक गॅस पुरवठा तर ठप्प झाला आहे. त्यामुळे हॉटेल व्यावसायिक मोठ्या संकटात सापडले आहेत. अनेक व्यावसायिक घरगुती गॅसचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करीत असल्याने देखील त्याचा देखील फटका घरगुती गॅस पुरवठ्यावर झाला आहे. त्याचबरोबर काही जण या संकटाला संधी समजून काळा बाजार करीत असल्याने गॅस तुटवडा वाढत आहे. दरम्यान गॅस पुरवठ्याअभावी छोटे उद्योजक देखील अडचणीत आले असून शासनाने लवकरात लवकर गॅस पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरात गॅस सिलिंडरच्या तीव्र टंचाईमुळे नागरिकांचे हाल सुरू असून, रोज रांगा लावूनही सिलिंडर मिळत नसल्याने संतप्त नागरिकांनी शुक्रवारी शहरातील गॅस एजन्सीसमोर थेट महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही काळ नाशिक-पुणे मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

ऑनलाईन बुकिंग करूनही अनेक दिवस प्रतीक्षा करून गॅस मिळत नसल्याने नागरिकांचा संयम सुटला. सकाळपासून रांगेत उभे राहूनही रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान गॅस वितरक आणि शासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

आखाती देशांतील युद्धपरिस्थितीमुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाल्याचे सांगितले जात असले, तरी शासनाकडून सर्वत्र गॅस मुबलक असल्याचा दावा केला जात आहे. मात्र प्रत्यक्षात संगमनेर शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर टंचाई जाणवत असून, पहाटेपासूनच विविध गॅस एजन्सीसमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. काही ठिकाणी काळाबाजार होत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत.

दरम्यान, शहरातील जुन्या नाशिक-पुणे महामार्गालगत असलेल्या एका गॅस एजन्सीसमोर रोजप्रमाणे नागरिक पहाटेपासून रांगेत उभे होते. मात्र सकाळी सुमारे ९ वाजता आज सिलिंडर शिल्लक नाही, उद्या मिळेल - बुकिंग ओटीपी आवश्यक असा फलक वितरण वाहनावर लावण्यात आला. या फलकावर तारीख नसल्याने नागरिकांमध्ये अधिकच संताप पसरला. अनेक दिवसांपासून चकरा मारत आहोत, कामधंदा सोडून उन्हात तासन्तास उभे राहावे लागते, तरीही सिलिंडर मिळत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. महिलांसह मोठ्या संख्येने नागरिक रांगेत उभे होते.

सिलिंडर मिळणार नसल्याचे स्पष्ट होताच नागरिकांनी रास्तारोकोचा मार्ग अवलंबला. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत नागरिकांची समजूत काढली. त्यांच्या मध्यस्थीने अखेर आंदोलन मागे घेण्यात आले.

सध्या वाढती टंचाई, वितरणातील अनियमितता आणि काळाबाजाराच्या तक्रारी यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# भडकलेले युद्ध थांबण्याची शक्यता

## आम्ही जिंकलो- ट्रम्प यांचा दावा, संघर्ष कायम



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी इस्त्रायल आणि अमेरिकेने मिळून इराण हल्ला केला आणि युद्धाला सुरूवात झाली. इराण आणि अमेरिकेच्या युद्धाला आज २० दिवस पूर्ण झाले. मात्र, युद्ध अधिक भडकताना दिसत आहे. या युद्धामुळे जग संकटात आहे. काहीही करून युद्ध बंद करा, अशी मागणी केली जात आहे. कोणीही युद्धात मागे हटताना दिसत नाही. होर्मुज खाडी बंद असल्याने तेलाची निर्यात आणि आखात थांबली आहे. तेल रिफायनरी आणि गॅस प्रकल्पांवरही मोठे हल्ले होताना दिसत आहेत. जागतिक बाजारात तेलाच्या किमती गगणाला पोहोचल्या आहेत. तेलाच्या किमतीवर नियंत्रण मिळवणे कठीण झाले. आम्हाला इराण, इस्त्रायल आणि अमेरिका युद्धाचा कोणताही फटका बसणार नाही असा दावा करणाऱ्यांनाच या युद्धाचा सर्वाधिक फटका बसला.जगातून हे युद्ध थांबवण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. यादरम्यानच आता युद्ध थांबवण्याबद्दल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठे विधान केले. एका तासात त्यांनी युद्धाबाबत वेगवेगळी दोन विधाने केली आहेत.डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध संपवण्याबद्दल थेट म्हटले की, मला वाटते की, आता युद्ध संपले पाहिजे. इराण देखील हे युद्ध संपवण्याचा विचार करत आहे. अमेरिका आपली उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या खूप जवळ नक्कीच पोहोचली आहे. अमेरिका इराण युद्धातील आपली लष्करी कारवाई कमी करण्याचा विचार करत असल्याचे अत्यंत मोठे विधान डोनाल्ड ट्रम्प यांनी केले.डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या या विधानामुळे थेट संकेत मिळत आहेत, की इराण आणि अमेरिका युद्ध कोणत्याही क्षणी थांबू शकते. २८ फेब्रुवारी २०२६ नंतर पहिल्यांदाच डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध संपवण्याबद्दल भाष्य केले. या युद्धामुळे जगातील अनेक देश जैरीस आले. जगाला याचा फटका बसत आहे. होर्मुज खाडी इराणकडून बंद करण्यात आली. यामुळे अनेक देशात कच्चे तेल आणि गॅसचा तुटवडा आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी एक तासापूर्वी अगोदर हे विधान करण्यापूर्वी म्हटले की, आपण बोलू शकतो, पण मला खरोखरच युद्धविराम नको आहे.

# मुंडे नंतर कोकाटे, आता चाकणकर

## राष्ट्रवादीची पडली तिसरी विकेट



मुंबई (वृत्तसंस्था)

नाशिक लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे वादग्रस्त ठरलेल्या रूपाली चाकणकर यांनी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कठोर भूमिकेनंतर महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. ढोंगी कॅप्टन अशोक खरातचा पर्दाफाश झाल्याने नाशिक सेक्स स्कँडलने राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे महायुती सरकारला झालेल्या नामुष्कीनंतर, संतप्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना त्यांच्या पदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले आहे.

स्पष्टीकरण देण्यासाठी चाकणकर यांनी शुक्रवारी संध्याकाळी उशिरा मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, परंतु मुख्यमंत्र्यांनी ऐकून घेण्यास नकार दिला. या संपूर्ण प्रकरणामुळे सरकारच्या प्रतिष्ठेला डाग लागलेला आम्ही सहन करणार नाही असा संदेश मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना आधीच दिला होता. जेव्हा चाकणकर आल्या तेंव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे स्पष्टीकरण ऐकण्यात फारसा रस दाखवला नाही.

राष्ट्रवादीतील (अजित पवार) नेते वादात अडकल्यानंतर त्यांना राजीनामा द्यावा लागल्याची तिसरी घटना सरकारच्या या कार्यकाळात घडली आहे. आधी तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांना राजीनामा द्यावा लागला होता.

वाल्मीक कराडशी संबंध असल्याच्या मुद्द्यावरून चौफेर टीका झाल्यानंतर प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत धनंजय मुंडे यांनी गेल्या मार्चमध्ये कृषी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता.

२०२४ मध्ये सत्तेत आलेल्या महायुती सरकारमधील मंत्र्याला वादामुळे राजीनामा द्यावा लागल्याची ती पहिलीच वेळ होती. कृषी खात्यातील घोटाळ्यांवरूनही त्यांच्यावर आरोप झाले होते. राजीनाम्यानंतर अद्याप धनंजय यांचे राजकीय पुनर्वसन होऊ शकलेले नाही.

मुंडे यांच्या जागी कृषिमंत्री झालेले माणिकराव कोकाटे यांना शेतकऱ्यांविषयी केलेल्या वादग्रस्त विधानांमुळे कृषी मंत्रिपदावरून हटवून क्रीडा व युवक कल्याण हे तुलनेने कमी महत्त्वाचे खाते देण्यात आले होते. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या सूचनेवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसा निर्णय घेतला होता. मुख्यमंत्री कोट्यातील फ्लॅट घेताना खोटी प्रमाणपत्रे सादर केल्याप्रकरणी नाशिकच्या न्यायालयाने तुरुंगवासाची शिक्षा सुनावल्याने कोकाटे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. कृषिमंत्रिपद दत्ता भरणे यांना देण्यात आले.

# आरोपी मोकाट, पोलिस तपासावर प्रश्नचिन्ह




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यात घडलेल्या एका अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे आणि रोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. इयत्ता सहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अज्ञात तरुणाने ॲसिड फेकल्याची घटना घडून पाच दिवस उलटले तरी आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही.

ही घटना मुलगी शाळेतून घरी परतत असताना घडली. अचानक झालेल्या या अमानुष हल्ल्यात ॲसिडमुळे तिचा चेहरा गंभीररीत्या भाजला असून तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. घटनेनंतर पोलिस प्रशासनाने तातडीने तपासाची सूत्रे हलवली. जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्वतः रुग्णालयात जाऊन पीडित मुलीची विचारपूस केली आणि तपास जलद गतीने करण्याचे आदेश दिले. तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक संगमनेरात तळ ठोकून आहे. आरोपीच्या शोधासाठी दोन वरिष्ठ अधिकारी आणि सुमारे ४० कर्मचाऱ्यांचे पथक नियुक्त करण्यात आल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला.

दरम्यान, पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनीही अहिल्यानगर दौऱ्यावर येत पीडितेची भेट घेतली आणि तपासाचा आढावा घेतला. मात्र, एवढ्या यंत्रणा कामाला लागूनही तपासात ठोस प्रगती न झाल्याने नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणात आरोपीचे रेखाचित्र जाहीर करण्यात आले असले तरी अद्याप कोणताही ठोस धागेदोरा हाती लागलेला नाही. घटनेमागील कारणही अस्पष्ट असल्याने तपास अधिकच गुंतागुंतीचा बनला आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान, या घटनेचे पडसाद अधिवेशनातही उमटले असून विविध स्तरांतून आरोपीला तातडीने अटक करण्याची मागणी जोर धरत आहे. सामाजिक संघटना, नागरिक आणि पालकवर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात असून आरोपीला त्वरित अटक करा असा एकमुखी आवाज उठत आहे.

एकीकडे पोलिसांकडून तपास सुरू असल्याचे सांगितले जात असताना, दुसरीकडे आरोपी मोकाट फिरत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर घटनेचा तपास वेगाने पूर्ण करून आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी आता तीव्र होत आहे.









# दीपक केसरकर अडकणार चौकशीच्या फेऱ्यात

## निकटवर्तीयाची एसआयटी चौकशी



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकमधील स्वयंघोषित कॅप्टन आणि भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणात आता माजी मंत्री दीपक केसरकरांच्या निकटवर्तीयाची एसआयटी चौकशी सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणात दीपक केसरकर यांचे निकटवर्तीय दीपक लोंढे एसआयटी चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत. एसआयटी टीमकडून दीपक लोंढेंची कसून चौकशी सुरू आहे. लोंढे सिन्नरमध्ये जमीन खरेदी विक्रीच्या व्यवसायात सक्रिय आहे. लोंढेकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिस अशोक खरातच्या राजकीय आणि व्यावसायिक भागीदारांपर्यंत पोहचणार आहेत. अशोक खरात प्रकरणात आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिला. अशोक चव्हाय यांच्या प्रकरणावरून रुपाली चाकणकर यांच्यावर विरोधकांकडून अनेक गंभीर आरोप होत आहेत. त्यांनी राजीनामा द्यावा यासाठी विरोधक प्रचंड आक्रमक झाले होते. अखेर शुक्रवारी रुपाली चाकणकर यांनी मुंख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेत चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. (पान ३ वर).

# जागतिक युद्धामागे अर्थकारणाचा मोठा खेळ - चंद्रशेखर टिळक

## मालपाणी स्मृती 'मंथन' व्याख्यानमाला; पहिल्या पुष्पात उलगडले युद्धाचे वास्तव



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -सध्या जग युद्धाच्या वणव्यात लोटले गेलेले आहे. त्याचा प्रारंभ तर झाला आहे, पण शेवट कधी होईल ते सांगता येत नाही. या युद्धाच्या मुळाशी कोणताही धर्म वगैरे नाही; तर पृथ्वीच्या पोटात दडलेल्या अनमोल खनिज संपत्तीवर वर्चस्व मिळवण्यासाठी आणि जागतिक अर्थकारणामध्ये स्वतःचा दबदबा निर्माण करण्यासाठी हे युद्ध खर्या अर्थाने लढले जात असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम अर्थतज्ञ आणि जागतिक अर्थकारण व राजकारणाचे भाष्यकार चंद्रशेखर टिळक यांनी केले.

मालपाणी उद्योग समूहाचे अध्वर्यू स्व.माधवलाल मालपाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ राजस्थान युवक मंडळाच्या वतीने आयोजित 'मंथन' व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना 'जागतिक राजकारण आणि भारतीय अर्थकारण' या विषयावर ते बोलत होते. सुमारे सव्वा तास चाललेल्या या अभ्यासपूर्ण व्याख्यानाच्या माध्यमातून त्यांनी जागतिक घडामोडी आणि त्याचा थेट भारतीय समाज जीवनावर होत असलेला परिणाम अत्यंत साध्या, सोप्या आणि रसाळ भाषेत श्रोत्यांच्या समोर मांडला. अत्यंत रुक्ष, क्लिष्ट आणि गुंतागुंतीचा विषय सहजपणे मांडण्याची त्यांची हातोटी प्रेक्षकांना मनापासून आवडली.

पृथ्वीच्या पोटात दडलेली खनिज संपत्ती आणि जागतिक राजकारण व अर्थकारण यांचा खूप जवळचा संबंध आहे. ही सांगड अनेक शतकांपासून आहे. या संपत्तीवर वर्चस्व मिळवण्यासाठी वेळोवेळी धुमश्चक्री झाल्याची अनेक उदाहरणे इतिहासातील दाखल्यांमधून मिळतात. या गोष्टींची वारंवार पुनरावृत्ती होत असते. त्याचाच परिपाक सध्याच्या इजराईल-अमेरिका आणि इराण या देशातील जीवघेण्या संघर्षातून आपल्याला बघायला मिळत आहे. महासत्ता असलेल्या अमेरिकेला कोणत्याही परिस्थितीत जागतिक अर्थकारणावर असलेली आपली पकड सैल होऊ द्यायची नाही. त्यासाठी अमेरिका आजपर्यंत विविध क्लुप्त्या लढवीत अल्याचेही टिळक यांनी सांगितले.

विविध देशांवर प्रभुत्व गाजविण्याची अमेरिकेची शैली भारताला मात्र कधीही नामोहरम करू शकली नाही. अलीकडच्या काही वर्षात भारताने आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने ठोस पावलं टाकली आहेत, त्यामुळे भारत अनेक गोष्टींमध्ये स्वयंपूर्ण झाला आहे. मेक इन इंडिया चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले आहे. लघुउद्योग आणि कुटीर उद्योग लाखोंच्या संख्येने उभे राहत आहेत त्यामुळे युद्धाचा कोणताही थेट दुष्परिणाम भारताला भोगावा लागलेला नाही असे त्यांनी यावेळी नमूद केले.

शस्त्रास्त्रांशी संबंधित व्यापार हे अमेरिकेचे शक्तिस्थळ आहे आणि त्यासाठी त्यांच्याकडून जगात वारंवार कुरापती काढल्या जात आहेत. अमेरिकेच्या भूमीत आजवर केवळ दोनवेळा युद्ध झाले आहे. एरवी अमेरिकेला प्रत्यक्ष स्वतःच्या भूमीवर युद्धाची झळ कधीही बसलेली नाही. इतरांना झुंजण्यास प्रवृत्त करणे हे अमेरिकेचे षडयंत्र असल्याचेही टिळकांनी यावेळी विविध दाखल्यांसह श्रोत्यांना सांगितले. मंडळाचे सहसचिव कृष्णा असावा प्रास्तविक आणि परिचय करून दिला. मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी स्वागत केले. कार्याध्यक्ष सुमित अट्टल यांनी आभार मानले. आजच्या व्याख्यानाला श्रोत्यांची मोठी उपस्थिती होती.

# मोदी मंत्रिमंडळात महाराष्ट्रातील प्रफुल्ल पटेल, श्रीकांत शिंदे, श्रीरंग बारणे यांना संधी ?

मुंबई (वृत्तसंस्था)

केंद्रीय मंत्रिमंडळात फेरफार करण्यासंदर्भात चर्चा सुरू आहे. प्रफुल्ल पटेल आणि श्रीकांत शिंदे यांना मंत्रिमंडळात पदे मिळू शकतात. १० राज्यांमधील ३७ जागांसाठी राज्यसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर आता केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची चर्चा सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील दोन नेते या शर्यतीत असू शकतात. त्यांच्यापैकी, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि सुनेत्रा पवार गटाचे प्रफुल्ल पटेल, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे आणि श्रीरंग बारणे यांना मंत्री म्हणून नियुक्त केले जाऊ शकते.

एकनाथ शिंदे यांनी अलीकडेच दिल्ली दौऱ्यावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. केंद्रीय मंत्रिमंडळ फेरबदलात काही मंत्र्यांना वगळले जाण्याची, तर काही खासदारांना मंत्रीपदे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तथापि, मंत्रिमंडळ विस्ताराबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

केंद्रीय मंत्रिमंडळ फेरबदलात काही मंत्र्यांना वगळले जाण्याची, तर काही खासदारांना मंत्रीपदे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तथापि, मंत्रिमंडळ विस्ताराबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

# भारताचे तेलवाहू जहाजे होर्मुज खाडीत अडकले

## भारताकडून प्रयत्न सुरू

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष काही कमी होण्याचे नाव घेत नाही. गेल्या २० दिवसांपासून युद्ध पेटले आहे. अमेरिकेसह सर्वच देशांना या युद्धाचा फटका बसत आहे. इराणकडून अमेरिका आणि इस्त्रायलला शिक्षा देण्याकरिता होर्मुज खाडी बंद करण्यात आली. अनेक देशांचे जहाजे तिथे अडकली आहेत. मालवाहू जहाजांची मोठी रांग होर्मुजमध्ये आहे. याच खाडीतून भारतामध्ये एलपीजी गॅस आणि कच्चे तेल दाखल होते. भारताचे अनेक जहाज तिथे अडकून पडली आहेत. भारतात एलपीजी गॅसची कमी असून व्यावसायिक सिलेंडरचे वितरण बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला. होर्मुज खाडीत इराण भारताच्या मदतीला आला. भारताचे काही जहाज इराणकडून सोडली जात आहेत. मात्र, भारतात सध्याच्या घडीला मोठा गॅस तुटवडा आहे, ही वस्तुस्थिती आहे. यादरम्यानच भारताचे होर्मुजमध्ये अडकलेल्या दोन जहाजांना होर्मुज खाडी पार करण्याची परवानगी मिळण्याची शक्यता आहे.आपल्या जहाजांना होर्मुज खाडी पार करता यावी, याकरिता भारत मैदानात उतरल्याचे बघायला मिळतंय. भारताने पूर्ण फिल्डिंग लावली आहे. भारतीय नौदल अनेक ठिकाणी आपली तैनाती वाढवत आहे. दहा दिवसांपूर्वी उत्तर अरबी समुद्रातून भारतीय बंदरांपर्यंत जहाजांना संरक्षण देण्यासाठी टास्क फोर्स तयार करण्यात आला होता.होर्मज खाडीच्या आसपास भारताने आपले सात जहाज पाठवल्याची माहिती मिळत आहे. होर्मुज खाडीतून भारतीय जहाजांना सुरक्षा देण्याकरिता भारतीय नौदलाने हा निर्णय घेतला. आता भारतीय नौदल अरबी समुद्र आणि ओमानच्या आखातात अतिरिक्त युद्धनौका तैनात करत आहे. मुळात म्हणजे या तैनातीचा मुख्य उद्देश इतकाच आहे की, एलपीजी आणि इंधन वाहून नेणाऱ्या जहाजांना सुरक्षित वाहतूक करता येईल.होर्मुज खाडीतून आज भारताचे दोन जहाज निघण्याची शक्यता आहे. एलपीजी गॅस या जहाजांवर आहे. या जहाजांना भारतीय नौदल सुरक्षा देईल. भविष्यातील कोणत्याही तैनातीसाठी पर्शियन गल्फच्या जवळ राहणे देखील महत्त्वाचे आहे. त्यामुळेही भारताकडून अशाप्रकारचे निर्णय घेतले जात आहेत.`.

# जगात एपस्टीन तर महाराष्ट्रात खरात फाईल्स - खा. राऊत

मुंबई (वृत्तसंस्था)

नाशिकमधील स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने राज्यभरात मोठी खळबळ उडवली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी या प्रकरणाची तुलना थेट जेफ्री एपस्टीन प्रकरणाशी करत जगात एपस्टीन फाईल्स गाजतात, तसेच महाराष्ट्रात आता खरात फाईल्स गाजत आहेत, असा स्फोटक दावा केला. राऊत यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.

लैंगिक शोषणाच्या गंभीर आरोपांमुळे अटकेत असलेल्या अशोक खरात याला न्यायालयाने २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात अनेक धक्कादायक बाबी समोर येत असून, राज्यातील काही बडे राजकीय नेते, उद्योगपती आणि सेलिब्रिटी त्याच्या संपर्कात होते, अशी चर्चा रंगली आहे. याशिवाय त्याने मोठ्या प्रमाणात संपत्ती जमवल्याचेही आरोप होत आहेत, ज्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे.

दरम्यान, या कारवाईबाबत राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदनही केले. त्यांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गुप्तपणे या प्रकरणाची चौकशी सुरू होती.



गृहखात्याच्या माध्यमातून आखलेल्या कारवाईमुळे या प्रकरणाची पाळेमुळे उखडली जात आहेत. अशा प्रकारच्या घटनांनी महाराष्ट्राची बदनामी होते. त्यामुळे दोषींवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री जर या प्रकरणात स्वच्छता मोहीम राबवत असतील, तर ते कौतुकास पात्र आहे, असेही राऊत म्हणाले.

राऊत यांनी पुढे आणखी गंभीर आरोप करत सांगितले की, खरातच्या मोबाईलमध्ये अनेक आक्षेपार्ह व्हिडिओ क्लिप्स सापडल्या असून त्यामुळे सत्ताधारी गटातील काही नेते तणावात आहेत. या प्रकरणात राज्यातील काही मंत्रीही त्याचे भक्त होते. ते त्याच्याकडे जाऊन विचित्र आणि घृणास्पद विधी करत होते, असा आरोप त्यांनी केला. पोलिसांनी जप्त केलेल्या पेन ड्राइव्हमध्ये ५८ व्हिडिओ असल्याचा दावा करत, हे व्हिडिओ सार्वजनिक झाले तर महाराष्ट्रातील सरकार कोसळू शकते, असा धक्कादायक इशाराही त्यांनी दिला.

# अस्पृश्यता, विषमता हा सर्वात मोठा अपराध - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (वृत्तसंस्था)

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याच्या आंदोलनाच्या माध्यमातून माणसाला मानवतेची जाणीव करून दिली. या आंदोलनाच्या माध्यमातून भारताला समतेकडे नेले. मुळात अस्पृश्यता व विषमता हा सर्वात मोठा अपराध आहे. त्यामुळे भावी पिढ्यांना समता व विषमता या दोन्ही गोष्टी कळल्या पाहिजेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्याचे पाणी चाखून ऐतिहासिक सत्याग्रह केला होता. या सत्याग्रहाला आज तब्बल १०० वर्षे पूर्ण झाली. या



निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी महाडला भेट देऊन चवदार तळे जलशुद्धीकरण व परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचे उद्घाटन केले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री डॉक्टर रामदास आठवले, राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मंत्री उदय सामंत, मंत्री भरत गोगावले, आमदार प्रवीण दरेकर आदी नेते व अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री यावेळी बोलताना म्हणाले, चवदार तळ्याचा सत्याग्रह हा भारताच्या इतिहासातील एक निर्णायक क्षण होता. 'बहिष्कृत भारत'मध्ये ३ एप्रिल १९२७ रोजी बाबासाहेबांनी चवदार तळ्याच्या आंदोलनाची माहिती देताना सांगितले होते की, ज्या प्रकारे फ्रेन्च राज्यक्रांतीने जगाचा इतिहास बदलला, अगदी त्याचप्रकारे या आंदोलनाने भारताचे भविष्य बदलणार आहे. गुलामगिरीच्या साखळ्या सोडून एक मोठा न्याय प्राप्त होणार आहे. भारतीय समाजात अनेक वर्षे आपल्याला गुलामगिरीत काढावी लागली. या गुलामगिरीच्या मुळाशी काय आहे? आपण सातत्याने गुलाम का झालो? हे पाहिले तर त्यामागे आमच्या समाजातील अनिष्ठ प्रथा होत्या.

# रुपया ९३. ७१ च्या विक्रमी नीचांकी पातळीवर

## कच्च्या तेलाच्या किंमतीतील वाढीचा परिणाम

मुंबई (वृत्तसंस्था)

पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकी डॉलर वधारल्याने आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी इक्विटीची विक्री सुरू ठेवल्याने, भारतीय रुपया आज विक्रमी नीचांकी पातळीवर बंद झाला. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपया ८२ पैशांनी घसरून ९३.७१ या विक्रमी नीचांकी पातळीवर बंद झाला. बुधवारी हे चलन ९२.८९ या सर्वकालीन नीचांकी पातळीवर बंद झाले होते. गुढीपाडव्यानिमित्त गुरुवारी परकीय चलन बाजार बंद होते.आजच्या सत्रादरम्यान, चलन इतिहासात पहिल्यांदाच प्रति डॉलर ९३ च्या पातळीखाली घसरले.

एलकेपी सिक्युरिटीजचे कमोडिटी आणि करन्सी विभागाचे व्हीपी रिसर्च ॲनालिस्ट, जतीन त्रिवेदी म्हणाले, वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींच्या नकारात्मक परिणामाचा बाजारांनी आक्रमकपणे अंदाज घेतल्यामुळे रुपया डॉलरच्या तुलनेत ९३.७१ पर्यंत घसरला



आणि त्यात मोठी कमजोरी दिसून आली. कच्च्या तेलाच्या किमतीतील सातत्यपूर्ण मजबुतीमुळे भारताचे आयात बिल लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता आहे, ज्यामुळे देशांतर्गत चलनावर सतत दबाव राहील. नजीकच्या काळात, रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९३.००-९४.२५ या कमकुवत पातळीवर व्यवहार करण्याची शक्यता आहे.

ॲम्बिट कॅपिटलने एका अहवालात म्हटले आहे की, पुढील एका वर्षात रुपयाचे ६.५ ते ७.५ टक्क्यांनी अवमूल्यन होण्याची शक्यता आहे.

चालू खात्यातील तूट वाढण्याची आणि भांडवली खात्याची आकडेवारी अस्थिर राहण्याची अपेक्षा असल्याने, मागील आकडेवारीनुसार तेलाचे दर ९०-११० डॉलर प्रति बॅरल झाल्यास रुपयाचे ६-७.५ टक्क्यांनी अवमूल्यन होऊ शकते. याचे कारण असे की, तेलाच्या किमती जास्त काळ उच्च राहिल्यास, इतर सकारात्मक घटकांच्या अनुपस्थितीत USD/INR चा दर ९७.५ ते ९८.९ पर्यंत खाली येऊ शकतो, असे ब्रोकरेजने म्हटले आहे. एचडीएफसी सिक्युरिटीजचे वरिष्ठ संशोधन विश्लेषक, दिलीप परमार म्हणाले, गुरुवारच्या सुट्टीनंतर भारतीय रुपयाची घसरण पुन्हा सुरू झाली आणि तो नवीन विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला. परदेशी निधीचा सतत होणारा बहिर्वाह आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती या 'दुहेरी फटक्या'मुळे रुपयाला मोठा फटका बसला आहे. भू-राजकीय अस्थिरता अल्पकालीन भावनांसाठी एक प्रमुख घटक असली तरी, चढत्या चॅनलचा प्रतिकार भेदल्यानंतर, ही जोडी ९३.७५ च्या पातळीवर लक्ष ठेवून आहे, तर आधार ९२.९० वर सरकला आहे.

बुधवारी रुपया ४९ पैशांनी घसरून अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ९२.८९ या पूर्वीच्या विक्रमी नीचांकी पातळीवर बंद झाला. दरम्यान, जागतिक तेल मानक असलेला ब्रेंट क्रूड, वायदे बाजारात ०.६४ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल १०९.३६ डॉलरवर व्यवहार करत होता. शेअर बाजारात, सेन्सेक्स ३२५ अंकांनी वाढून ७४,५३२ अंकांवर बंद झाला, तर निफ्टी ११२ अंकांनी वाढून २३,११४ अंकांवर पोहोचला. एक्सचेंजच्या आकडेवारीनुसार, परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी गुरुवारी निव्वळ आधारावर ७,५५८.१९ कोटी रुपयांच्या इक्विटीची विक्री केली.

# डिझेल खरेदीतून वर्षाला २४१ कोटी रुपयांची बचत होणार; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) आर्थिक स्थिती सक्षम करण्यासाठी पर्यायी उत्पन्न स्त्रोत निर्माण करण्याबरोबरच खर्च नियंत्रणासाठी ठोस व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले जात असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. डिझेल खरेदीची निविदा प्रक्रिया कोणताही हस्तक्षेप न सहन करता पारदर्शक पद्धतीने राबविल्यामुळे केवळ डिझेल खरेदीतून दरवर्षी सुमारे २४१ कोटी रुपयांची बचत होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, सध्या एसटी महामंडळावर सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा संचित तोटा आहे. चालू आर्थिक



वर्षातही फेब्रुवारी २०२६ अखेर सुमारे ७५० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. दररोज एसटीच्या उत्पन्नापेक्षा १ ते २ कोटी रुपये अधिक खर्च होत असल्याने केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहणे शक्य नाही. त्यामुळे पर्यायी उत्पन्न स्त्रोत निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. चालू आर्थिक वर्षात डिझेल बचतीबरोबरच जाहिरातीतून सुमारे २५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

डिझेल खरेदी प्रक्रियेविषयी माहिती देताना मंत्री सरनाईक म्हणाले की, यापूर्वी अनेक वर्षे ठराविक सवलतीवर डिझेल खरेदी केली जात होती. मात्र स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे अधिक सवलत मिळवण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया राबविण्यात आली. ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, नियमबद्ध आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडली असून कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, अशी आमची ठाम भूमिका होती.

काही कंपन्यांनी माध्यमांद्वारे चुकीची माहिती पसरवून निविदा प्रक्रियेवर परिणाम करण्याचा प्रयत्न केला; मात्र असे प्रयत्न हाणून पाडण्यात आले. एका कंपनीने न्यायालयात धाव घेतली होती; मात्र न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने निविदा प्रक्रिया योग्य असल्याची पुष्टी मिळाली, असेही त्यांनी नमूद केले. सध्या एसटीला दररोज सुमारे १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता असून वर्षाकाठी सुमारे ४० कोटी लिटर डिझेल खरेदी केली जाते. यासाठी दरवर्षी सुमारे ३,४०० कोटी रुपये खर्च होतो. भविष्यात ८ हजार नवीन डिझेल बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर हा खर्च सुमारे ४,७०० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यापूर्वी प्रति लिटर सुमारे २.७० रुपयांची सवलत मिळत होती, ती वाढवून ३ रुपये करण्यात आली होती. मात्र स्पर्धात्मक निविदेनंतर प्रति लिटर ५.१३ रुपयांची सवलत मिळाली असून ही सध्याच्या दरापेक्षा २.१३ रुपयांनी अधिक आहे. या निर्णयामुळे एसटी महामंडळाला दरवर्षी सुमारे २४० ते २४१ कोटी रुपयांची बचत अपेक्षित आहे.

एसटीच्या महसूलवाढीसाठी इंधन विक्री क्षेत्रातही महामंडळ प्रवेश करत आहे. डिझेल, पेट्रोल, सीएनजी, एलएनजी तसेच भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर १०० ते ११० ठिकाणी मल्टी-मोडल इंधन पंप उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. या उपक्रमातून दरवर्षी सुमारे १०० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे. धुळे येथे अशा प्रकारचा प्रकल्प आधीच कार्यान्वित करण्यात आला आहे.

# ऊर्जा क्षेत्रात गुंतवणुकीसाठी पंतप्रधान मोदींचे जागतिक गुंतवणूकदारांना आमंत्रण

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक गुंतवणूकदारांना भारताच्या ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी भारतात उत्पादन, गुंतवणूक, नवकल्पना आणि ऊर्जा क्षेत्राचा व्यापक विस्तार करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करत, विकासासाठी विद्युतीकरण आणि शाश्वततेसाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत, असे नमूद केले.

इंडियन इलेक्ट्रिसिटी समिट २०२६ मध्ये गुरुवारी केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल यांनी वाचून दाखवलेल्या लिखित संदेशात पंतप्रधानांनी सांगितले की, भारत आपल्या ऊर्जा प्रवासातील निर्णायक टप्प्यावर उभा आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारत ऊर्जा क्षेत्रात मोठ्या



बदलांच्या दिशेने वाटचाल करत आहे. या शिखर परिषदेचे उद्दिष्ट संपूर्ण ऊर्जा परिसंस्थेला एका मंचावर आणून विचारांची देवाणघेवाण करणे आणि ऊर्जा विकासासाठी सामूहिक मार्ग निश्चित करणे आहे. पंतप्रधानांनी सांगितले की, देशात पायाभूत सुविधा मजबूत केल्या जात असून सर्वांसाठी विश्वासार्ह ऊर्जा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात भारताने मोठी प्रगती केली असून २०३० पर्यंत ५०० गीगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. यापैकी ५० टक्क्यांहून अधिक गैर-जीवाश्म इंधन क्षमता आधीच साध्य करण्यात आली आहे. एक सूर्य, एक जग, एक ग्रिड यांसारख्या उपक्रमांद्वारे जागतिक सहकार्याचा दृष्टिकोन स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले. भारत मजबूत पुरवठा साखळी निर्माण करत विश्वासार्ह ऊर्जा भागीदार म्हणून उदयास येत आहे. बॅटरी उत्पादन, रोजगारनिर्मिती आणि सुधारित धोरणांमुळे गुंतवणुकीला चालना मिळत आहे. तसेच, 'शांती अधिनियम २०२५'मुळे अणुऊर्जा क्षेत्रात नवीन संधी निर्माण होत असून 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना'मुळे वितरित ऊर्जा उत्पादन आणि शाश्वत वापराला प्रोत्साहन मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
● मेडिसिन ● सर्जरी
● स्त्रीरोग – प्रसुति
● मुळव्याध–भगंदर–फिशर
● लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line : 7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# सातारा जि.प. निवडणूकीत राडा

## मंत्री शंभूराज देसाई यांना मारहाण ?



सातारा (वृत्तसंस्था)

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवड प्रक्रिया आज पार पडली. भाजपाने मोठा विजय मिळवत पहिल्यांदाच सातारा जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन केली. दरम्यान, या निवड प्रक्रियेला हिंसक वळण लागले. या निवडीदरम्यान झालेल्या प्रचंड गोंधळात जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांना भाजप कार्यकर्त्यांकडून धक्काबुक्की व मारहाण झाल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. यात त्यांच्या हाताला दुखापत देखील झाली आहे या घटनेमुळे साताऱ्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू असताना भाजपा आणि शिंदेसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार घोषणाबाजी आणि ढकलाढकली झाली. या गर्दीत पालकमंत्री शंभूराज देसाई यांना धक्काबुक्की झाल्याचा आरोप आहे. घटनेनंतर पत्रकारांसोबत बोलताना देसाई म्हणाले की, गर्दीत मला नेमका धक्का कसा लागला हे सुरुवातीला समजले नाही. मात्र जेव्हा हाताला जखम होऊन रक्त येऊ लागले, तेव्हा दुखापतीची जाणीव झाली. या घटनेनंतर देसाई समर्थक आक्रमक झाले असून, याचे तीव्र पडसाद उमटतील असा इशारा त्यांनी दिला आहे.

या राड्यावर प्रतिक्रिया देताना राज्याचे पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी पोलीस प्रशासनाला धारेवर धरले. पोलीस बळाचा चुकीचा वापर करून विरोधी सदस्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. जर थेट मंत्री आणि लोकप्रतिनिधींवरच पोलीस धावून येत असतील, तर ही लोकशाहीसाठी अत्यंत गंभीर बाब आहे, असे पाटील म्हणाले.

दुसरीकडे, आमदार शशिकांत शिंदे यांनी प्रशासनावर टीका केली आहे. आमच्या सदस्यांना मतदानाचा अधिकार असतानाही पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने सभागृहाबाहेर काढले. प्रशासनाचा गैरवापर करून आमच्या सदस्यांवर दबाव टाकण्यात आला आणि त्यांना हात वर करण्यास भाग पाडले, असा खळबळजनक आरोप शिंदेंनी केला. आम्ही हा अन्याय सहन करणार नाही, आता याविरोधात रस्त्यावरची लढाई लढू, असा इशाराही त्यांनी दिला.

## दीपक केसरकर अडकणार...

पान १ वरून–

त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत अशोक खरातवर कठोर कारवाईची मागणी केली.

रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांच्यावर टीका केली. त्यांनी या पोस्टमध्ये लिहिले की, 'राज्यातील सर्वाधिक अकार्यक्षम महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राजीनामा तर दिला पण राजीनामा देताना त्यांचा माज उतरलेला नाही. स्वेच्छेने वैयक्तिक कारणासाठी राजीनामा देत असल्याचा उल्लेख त्यांनी पत्रात केला आहे. म्हणजे खरात प्रकरणात त्यांनी महिलांवर, पत्रकारांवर टाकलेला दबाव या प्रकरणी पोलिस तक्रार होऊ नये म्हणून केलेले उद्योग याचा कुठलाही खेद, चूक झाली अस त्यांना वाटत नाही. तसंच, राजीनामा देताना पण उपकार असल्यागत चाकणकर यांचे वागणे निषेधार्ह आहे. रूपाली चाकणकर हा छोटा मासा आहे यात अजून किती मंत्री होते कोणी या बलात्कारी बाबाला राजाश्रय दिला,वाचवण्याचा प्रयत्न केला त्या सगळ्यांवर कारवाई झाली पाहिजे.

# कौशल्य प्रशिक्षण शाळांमध्ये सक्तीचे करण्याची गरज - ना. विखे पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

शालेय अभ्यासक्रमाच्या बरोबरीने आता कौशल्य शिक्षणाची सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळा आता कौशल्य विकासाचे केंद्र झाले पाहीजे अशी अपेक्षा जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

बाल शिक्षण मंडळाच्या जाजू इंग्लिश मिडीयम स्कुलच्या इमारतीचे उद्‌घाटन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे चेअरमन डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. आ. अमोल खताळ, भाजपा नेते शाम जाजू, संस्थेचे अध्यक्ष अॅड.अरविंदराव गणपुले, सचिव सौ. निला जोशी, डॉ.अरविंद रसाळ, जाजू परिवाराचे प्रतिनिधी सुरेश जाजू, निलेश जाजू यांच्यासह मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अतिशय समर्पित भावनेने बाल शिक्षण मंडळाची वाटचाल १९५२ सालापासून सुरु आहे. समाजातील दानशुर व्यक्तिंनी संस्थेच्या या शैक्षणिक कार्याला पाठबळही दिले आहे. मात्र काळानूरुप आता शैक्षणिक संस्थानांही आपल्या कार्यपध्दतीमध्ये बदल करावा लागणार असल्याचे स्पष्ट करुन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला दिलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अंतर्भाव आपल्या शैक्षणिक कार्यामध्ये केला पाहीजे.

आज कौशल्य शिक्षणाचा मोठा कार्यक्रम संपूर्ण देशामध्ये सुरु आहे. विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी शालेय जीवनापासूनच कौशल्य प्रशिक्षण सुरु झाले तर, विद्यार्थ्यांचा प्रवास सुकर होईल. त्यामुळेच कौशल्य प्रशिक्षणाचा विषय आता प्रत्येक शाळेमध्ये सक्तीचा करावा अशी विनंती आपण मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्र्यांना करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कोचिंग क्लास ही सर्वात मोठी किड ही शिक्षण व्यवस्थेला लागली असून, आपल्या संस्थेतील विद्यार्थी कोचिंग क्लासला जाणे म्हणजे हे आपले अपयश आहे असे समजून कोचिंग क्लासला आमचा विद्यार्थी जाणार नाही हा संकल्प करण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले.

विचारवंत डॉ.विनय सहस्त्रबुध्दे यांनी शालेय शिक्षणाच्या व्यवस्थेमध्ये विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून संरचना आणि पायाभूत सुविधा शाळांमध्ये निर्माण झाल्या पाहीजे. आता पाठ्यपुस्तक बनविण्यासाठी संस्थानाही मुभा देण्यात आली असल्याने शाळांना अभ्यासक्रम तयार करणे शक्य आहे. आज इंग्रजी माध्यमातून आपण शिक्षण देणार आहात तर, बिनभेसळीची शुध्द मराठी भाषा सुध्दा शिकवा तरच, आपली भाषा जीवंत राहील. शाळांमध्ये स्मार्टफोन रोखण्याचा प्रयत्न निश्चित झाला पाहीजे. असे सुचित करुन, सहस्त्रबुध्दे म्हणाले की, यामुळे आपण चुकीच्या गोष्टींना निमंत्रण देत आहोत. जबाबदार पालकांनी केवळ शाळेवर अवलंबून राहु नये यासाठी आता पालकांचे प्रबोधन वर्गही शाळांमधून सुरु करण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी सांगितले.

# जागतिक चिमणी दिनानिमित्त राजूरमध्ये विविध उपक्रम



छाया – विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - आजच्या आधुनिक युगात एकेकाळी अंगणात चिवचिवाट करणाऱ्या चिमण्या आता शहरांसह ग्रामीण भागातूनही लुप्त होताना दिसत आहेत. पर्यावरणातील प्रत्येक जीवाचे अस्तित्व महत्त्वाचे असल्याची जाणीव ठेवत राजूर येथील श्री समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'पक्षी वाचवा, चिमणी वाचवा' अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात पक्ष्यांसाठी घरटी तयार करणे, पाणीपात्र ठेवणे, धान्य वाटप आदी कार्यक्रम राबविण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाच्या श्रीमती रजनी टीभे, निसर्गप्रेमी रमाकांत डेरे तसेच आदिवासी संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ साबळे प्राचार्य किरण भागवत, सतीश काळे, विनायक साळवे, सुनीता पापळ सोमनाथ पंडित उपस्थित होते.

'उठा उठा चिऊताई', 'चिऊताई चिऊताई दार उघड' यांसारख्या कवितांपासून पंचतंत्रातील गोष्टींपर्यंत विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. टाकाऊ वस्तूंपासून घरटी बनविण्याचे प्रशिक्षण, छायाचित्रांवरून पक्षी ओळखण्याचे खेळ यामुळे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. जागतिक चिमणी दिनानिमित्त 'जीवदया व स्वामी समर्थ शिक्षण संस्थे'तर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सामाजिक कार्यकर्ते अनिकेत चांडोले व विवेक जगदाळे यांनी विद्यार्थ्यांना, शाळांना व मंदिरांना अल्प किमतीतील घरटी मोफत वितरित केली.

प्रसंगी अनिकेत चांडोले यांनी सांगितले की, चिमण्यांना पिण्यासाठी व अंघोळीसाठी पाणी तसेच धुळीची आवश्यकता असते. मात्र कॉंक्रिटीकरणामुळे त्यांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम झाला आहे.

प्राचार्या सौ. मंजुषा काळे यांनी पर्यावरणपूरक विकास, देशी वृक्ष लागवड व सेंद्रिय शेतीचा अवलंब हे चिमण्यांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाय असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण भागवत यांनी केले, तर आभार कुमारी कांचन माळवे यांनी मानले. या उपक्रमात सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# श्री ज्योतिबा यात्रेनिमित्त विविध याग, भजन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चैत्र शु. मासारंभी श्री ज्योतिबा देवाच्या यात्रे निमित्त साळीवाडा येथील ज्योतिबा मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चैत्र शुद्ध १ गुरुवार दि. १९ पासून ते चैत्र शुद्ध सप्तमी, बुधवार दि. २५ पर्यंत हा धार्मिक उत्सव साजरा होणार असल्याची माहिती मंदिर प्रमुख नंदू कांबळे यांनी दिली आहे.

पहिल्या दिवशी गणेशयाग दुसऱ्या दिवशी स्वामीयाग, तिसऱ्या दिवशी मारुतीयाग, चौथ्या दिवशी मल्हारयाग तर पाचव्या दिवशी रुद्रयाग होणार आहे. तद्नंतर रात्री स्वामी स्तवन होणार असून सोमवार दि. २३ (चैत्र शुद्ध पंचमी) रोजी वंदनीय तीर्थरूप नाना करंदीकर संस्थापित श्री स्वामी समर्थ परिवार, ठाणे यांच्या वतीने स्तवन, संगीत प्रार्थना कार्यक्रम होणार असून रात्री ९ वाजता आरोग्य संजीवनी स्पोर्ट अकॅडमीकडून मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत. मंगळवार दि. २४ रोजी दुपारी ४ वाजता चंडी यागाचे आयोजन करण्यात आले असून रात्री ९ वाजता संगमनेर प्रभात फेरी यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम होणार आहे. बुधवार दि. २५ रोजी श्री ज्योतिबा प्रगट दिनानिमित्त दुपारी ५ वाजता पालखी सोहळा पार पडणार असून संध्याकाळी महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे आयोजन ज्योतिबा भक्त गणेश उत्सव मंडळ, रेणुका माता उत्सव समिती, खंडोबा देवस्थान ट्रस्ट, जिव्हेश्वर युवा मंच, मुंजोबा प्रतिष्ठान, दिंडोरी प्रणित स्वामी समर्थ सेवा केंद्र माळुंगी परिसर, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

# अमृतवाहिनी आयटीआयच्या 205 विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षेपूर्वी टाटा मोटर्स कंपनीमध्ये निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दर्जेदार शैक्षणिक गुणवत्तेमुळे अमृतवाहिनी ब्रँड हा विद्यार्थी, पालक, उद्योग क्षेत्र आणि तंत्रज्ञान यामध्ये सुपरीत आणि लोकप्रिय झाला आहे. पुणे विद्यापीठातील उत्कृष्ट महाविद्यालयाचे मानांकन असणाऱ्या व नॅकचा ए प्लस दर्जा असणाऱ्या अमृतवाहिनी आयटीआयच्या २०५ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा पूर्वी टाटा मोटर्स या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य व्ही. व्ही. भाटे यांनी दिली आहे.

याविषयी अधिक माहिती देताना भाटे म्हणाले की, अमृतवाहिनी आयटीआय मध्ये १८ मार्च २०२६ रोजी टाटा मोटर्स पॅसेंजर कार पुणे या नामांकित कंपनीचा कॅम्पस इंटरव्यू पार पडला. यात आयटीआयच्या सुमारे २०५ विद्यार्थ्यांची परीक्षेपूर्वीच चांगल्या पॅकेजवर निवड झाली आहे. टाटा मोटर्सचे एच. आर. मॅनेजर अक्षय जाधव, एच. आर. एक्झिटकेटीव प्रसन्न जेधे, एच. आर. एक्झिक्यूटिव्ह निलेश भाकरे यांनी अंतिम वर्षाच्या मेकॅनिक मोटर वेहिकल, मेकॅनिक डिझेल, फिटर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोसेसिंग असिस्टंट या ट्रेडच्या विभागातील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या त्यापैकी २०५ विद्यार्थ्यांची चांगल्या पॅकेजवर निवड झाली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी आयटीआयची १९८४ साली स्थापना केली. त्यानंतर माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी शिक्षण संस्थेने गुणवत्तेच्या बाबतीत भरारी घेतली. येथील शैक्षणिक वातावरण, निसर्ग सुंदर परिसर, शिस्त ,स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व आधुनिक सुविधा यामुळे विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यू मध्ये नामांकित कंपन्यांमध्ये निवड होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मा. महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, विश्वस्त आ. डॉ. सुधीरजी तांबे, कार्यकारी विश्वस्त मा. शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडमिक्स डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, प्राचार्य व्ही व्ही भाटे यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले असून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# समशेरपूर शाखा डाकघराचे उपडाकघरात रूपांतर

युवावार्ता (प्रतिनिधी)

समशेरपूर - अकोले तालुक्यातील समशेरपूर येथील शाखा डाकघराचे उपडाकघरात रूपांतर करण्यात आले असून, मुंबई सर्कल कार्यालयाच्या मंजुरीनुसार या उपडाकघरास ४२२६१२ हा स्वतंत्र पिन कोड बहाल करण्यात आला आहे.



समशेरपूर हा भाग भौगोलिकदृष्ट्या अकोले तालुक्यापासून काहीसा दूर असल्यामुळे येथील टपाल व्यवहार यापूर्वी अकोले उपडाकघर अंतर्गत चालत होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थांनी गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर या मागणीस यश मिळाल्याने परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

या उपडाकघराचे उद्‌घाटन उपसरपंच नितीन बेनके, अगस्ती साखर कारखान्याचे संचालक सचिन दराडे, ज्येष्ठ नेते विलास भरितकर, सुनील दराडे तसेच पत्रकार शांताराम दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी सहाय्यक डाक अधीक्षक (मुख्यालय) संतोष जोशी, सेवानिवृत्त टपाल अधिकारी हमीद पटेल आणि लक्ष्मीकांत धर्माधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रास्ताविकात संतोष जोशी यांनी सांगितले की, समशेरपूर उपडाकघराशी शेजारील ०९ शाखा डाकघरे जोडण्यात आली असून यामुळे टपाल सेवा अधिक सक्षम होणार आहे. तसेच अकोले व संगमनेर येथे उपलब्ध असलेल्या सर्व पोस्टल सुविधा आता समशेरपूर येथेच उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समशेरपूर ही माझी जन्मभूमी असून येथे कार्यरत असताना या उपडाकघराचे उद्घाटन होणे ही अत्यंत आनंदाची बाब असल्याचे संतोष जोशी यांनी नमूद केले.

यावेळी नागरिकांना पोस्टाच्या विविध अल्पबचत योजनांमध्ये-आरडी, मासिक उत्पन्न योजना, ज्येष्ठ नागरिक योजना, टाइम डिपॉझिट तसेच टपाल जीवन विमा-सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या मागणीस यश मिळाल्याने ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत पोस्ट प्रशासनाचे आभार मानले असून, भविष्यात पोस्टाच्या योजनांमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# संपादकीय...

जागतिक वन दिनानिमित्त

## घटते वनक्षेत्र आणि प्रदूषणाचे वाढते संकट

२१ मार्च हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय वन दिवस म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने २०१२ साली या दिवसाची घोषणा केली आणि तेव्हापासून वनसंवर्धनाचा संदेश जगभर पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य या दिवसातून केले जात आहे. वन म्हणजे केवळ झाडे नव्हेत, तर संपूर्ण जीवसृष्टीचा आधारस्तंभ आहेत. आजच्या काळात मात्र वाढत्या नागरीकरणामुळे आणि मानवी स्वार्थामुळे वनक्षेत्र झपाट्याने कमी होत आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. राष्ट्रीय वन अहवाल २०२३ नुसार भारतात केवळ २१ टक्के आणि महाराष्ट्रात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे, ही स्थिती भविष्यासाठी धोक्याची घंटा ठरू शकते. निसर्ग हा मानवाच्या अस्तित्वाचा पाया आहे. निसर्ग असेल तरच जीवन आहे आणि निसर्ग टिकवून ठेवण्यासाठी वनक्षेत्र अत्यावश्यक आहे. परंतु आजच्या विकासाच्या नावाखाली जंगलांची तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे. रस्ते, उद्योग, वसाहती आणि विविध प्रकल्पांच्या आडून वनक्षेत्र कमी होत आहे. यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. वनक्षेत्र घटल्याने हवामानातील बदल अधिक तीव्र होत आहेत. अती उष्णता, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर, भूस्खलन आणि समुद्राच्या पातळीत वाढ यांसारख्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. आंतरराष्ट्रीय निकषांनुसार कोणत्याही देशात किमान ३३ टक्के वनक्षेत्र असणे आवश्यक आहे. मात्र भारतात हे प्रमाण केवळ २१ टक्क्यांवर आहे, तर महाराष्ट्रात ते आणखी कमी म्हणजे १६ टक्क्यांवर आले आहे. याचा अर्थ आपण पर्यावरणीय दृष्ट्या धोकादायक टप्प्यावर उभे आहोत. देशातील काही राज्यांनी वनक्षेत्र वाढविण्यात प्रगती केली असली तरी महाराष्ट्राची स्थिती तुलनेने मागे आहे. त्यामुळे राज्य सरकारने आणि स्थानिक प्रशासनाने याबाबत अधिक गांभीर्याने पावले उचलणे आवश्यक आहे. वनक्षेत्र कमी होण्याचा सर्वाधिक फटका वन्यजीवांना बसत आहे. जंगलातील प्राणी अन्न आणि पाण्याच्या शोधात मानवी वस्तीमध्ये येत आहेत. वाघ, बिबट्या, अस्वल यांसारखे हिंसक प्राणी गावांमध्ये दिसू लागले आहेत. यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढत असून अनेकदा दोघांचेही नुकसान होत आहे. जंगलतोडीमुळे हत्तींचे कळप स्थलांतर करताना दिसत आहेत आणि अनेक अपघातांमध्ये त्यांचा मृत्यू होत आहे. हे सर्व चित्र अत्यंत वेदनादायी आहे. याशिवाय वनक्षेत्राच्या घटामुळे वायुप्रदूषणाचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४ या अहवालानुसार भारतातील वायुप्रदूषण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. जगभरातील वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी मोठा वाटा भारताचा आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वनक्षेत्र वाढविणे हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. झाडे कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि वातावरण शुद्ध ठेवतात, त्यामुळे वृक्षलागवड ही काळाची गरज बनली आहे. वनसंवर्धन ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. वृक्षतोड थांबवणे, मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे आणि लावलेल्या झाडांची काळजी घेणे हे सर्वांनी अंगीकारले पाहिजे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांनी या कार्यात पुढाकार घेणे आवश्यक आहे. वनक्षेत्र सुरक्षित तरच जीवसृष्टी सुरक्षित हा मंत्र प्रत्येकाने आत्मसात केला पाहिजे. आजच्या घडीला भारताला ३३ टक्के वनक्षेत्र गाठण्यासाठी सुमारे १२ टक्के वाढ करावी लागणार आहे, तर महाराष्ट्राला तब्बल १७ टक्के वाढ करावी लागणार आहे. ही मोठी जबाबदारी असली तरी ती अशक्य नाही. योग्य नियोजन, कठोर अंमलबजावणी आणि जनतेचा सहभाग यामुळे हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ, निरोगी आणि समृद्ध पर्यावरण देण्यासाठी आजच ठोस पावले उचलण्याची गरज आहे. वन वाचविणे म्हणजेच आपले भविष्य वाचविणे होय. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय वन दिनानिमित्त केवळ औपचारिकता न ठेवता प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर नक्कीच परिस्थितीत सकारात्मक बदल घडू शकतो. निसर्गाशी सुसंवाद राखत विकास साधणे हीच खरी शाश्वत प्रगती आहे. जय हिंद!


CorelDRAW Ps Ai Id

WE ARE HIRING

JOIN OUR TEAM

GRAPHIC DESIGNER

Send Resume on Whatsapp

Contact : 7720046005


# चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्त संगमनेरात अभिवादन सभा



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर येथे प्रवरा नदी तीरावरील गंगामाई घाटावर चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त अभिवादन सभा उत्साहात पार पडली. सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमात विविध प्रगतिशील संघटनांनी एकत्र येत ऐतिहासिक लढ्याला अभिवादन केले. राष्ट्र सेवा दल आणि छात्र भारतीने या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ साली महाड येथे चवदार तळे सत्याग्रह छेडला. त्या काळात अस्पृश्य समाजाला सार्वजनिक पाणवठ्यांवरून पाणी घेण्यास बंदी होती. या अन्यायकारक व्यवस्थेविरोधात आंबेडकरांनी हजारो अनुयायांसह महाड येथे आंदोलन उभारले. त्यांनी चवदार तळ्याचे पाणी प्राशन करून समानतेचा अधिकार प्रत्यक्षात सिद्ध केला.

हा सत्याग्रह केवळ पाण्याच्या हक्कासाठी नव्हता, तर तो मानवी सन्मान, समानता आणि सामाजिक न्यायासाठीचा निर्णायक टप्पा ठरला. या आंदोलनानंतर अस्पृश्यतेविरोधातील लढ्याला नवी दिशा मिळाली आणि समाजातील भेदभावाविरोधात व्यापक जनजागृती झाली. चवदार तळे सत्याग्रह भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. या ऐतिहासिक लढ्याच्या शताब्दी वर्षानिमित्त संगमनेर तालुक्यातील विविध संघटनांनी एकत्र येत गंगामाई घाटावर अभिवादन सभेचे आयोजन केले होते. कार्यक्रमात वक्त्यांनी आंबेडकरांच्या विचारांची आजच्या काळातही तितकीच गरज असल्याचे अधोरेखित केले. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन करण्यात आले. चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी आणि महात्मा फुले यांच्या जयंतीचे २०० वर्षे, या निमित्ताने देशभरात विषमता निर्मूलन निर्धार वर्ष साजरे करणार असल्याचे राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय सचिव डॉ. सागर भालेराव यांनी सांगितले.

डॉ. आंबेडकरांचे समतावादी विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात अजूनही आपल्याला यश आले नाही, असे डॉ. तांबे म्हणाले. आपण सर्वांनी एकदिलाने, एकमताने संविधानिक मूल्यांचा प्रचार प्रसार केला पाहिजे, असे मत डॉ. सुधीर तांबे यांनी व्यक्त केले. या सभेला डॉ. सागर भालेराव, डॉ. सुधीर तांबे, यांच्यासह के. जी. भालेराव, हिरालाल पगडाल, अजिजीभाई ओहारा, अनिकेत घुले, ज्ञानेश्वर राक्षे, प्रविण गायकवाड, रघुनाथ भालेराव, प्रवीण गायकवाड, सुनंदा मेढे, संगीता जामधडे, हीना सोनावणे, सूर्यकांत शिंदे, किशोर चव्हाण, ज्ञानेश्वर सानप, जुबेर इनामदार, राहुल जऱ्हाड, विशाल शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी चवदार तळे सत्याग्रहाच्या आठवणींना उजाळा देत सामाजिक परिवर्तनासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.


धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


# अकोल्यात गिन गौर सण उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी) - अकोले - विवाहित स्त्रिया आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळावे यासाठी, तर अविवाहित मुली मनोवांछित पती मिळावा म्हणून गणगौरची पूजा करतात. याचा उत्सव म्हणून महिला गिन गौर ची रोज मिरवणूक काढतात.

अकोल्यात देखील माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. प्रियंका बुब, उपाध्यक्षा सौ. जयश्री मुंदडा, सेक्रेटरी सौ. तृप्ती सारडा, सह-सेक्रेटरी सौ. प्रेरणा वर्मा, कोषाध्यक्षा सौ. ज्योती सारडा, प्रसिद्धी प्रमुख सौ. ज्योती जाजू व महिला मंडळ सदस्याच्या सहकार्याने शहरातून दररोज गिन गौर ची मिरवणूक काढतात. यावेळी राजस्थानी समाजातील सर्व महिला, युवती यात सहभागी होतात.

अध्यक्षा प्रियंका बुब व सचिव तृप्ती सारडा यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, पार्वती देवी यांनी भगवान शिव यांना मिळवण्यासाठी कठोर तप केले, त्यामुळे त्या आदर्श पत्नीचे प्रतीक मानल्या जातात. त्यांच्यासारखे सुखी जीवन मिळावे म्हणून हा सण साजरा केला जातो. राजस्थानी महिलांचा गणगौर (गिन गौर) सण अतिशय महत्त्वाचा आणि पारंपरिक सण आहे. हा सण मुख्यतः पार्वती देवी (गौरी) आणि भगवान शिव (ईसर) यांच्या पूजेसाठी साजरा केला जातो. यावेळी गोर गवर गोमती, ईसर पूजे पार्वती तसेच गणगौर माता आवो जी, म्हारे अंगना पधारो जी अशी विविध पारंपारीक गीते म्हटली जातात.

या काळात महिला १६ दिवस उपवास आणि पूजा करतात. मातीच्या गौरी-ईसरच्या मूर्ती बनवून सजवतात. सुंदर पारंपरिक वेशभूषा (राजस्थानी पोशाख) परिधान करून गाणी, नृत्य आणि मिरवणुका काढल्या जातात. शेवटी गौरीचे विसर्जन केले जाते. विशेष महत्त्व, हा सण विशेषतः राजस्थान मध्ये मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. आणि देश विदेशात राजस्थानी समाज जेथे आहे, त्या ठिकाणी देखील तितक्याच मनोभावे पद्धतीने साजरा केला जातो. तो स्त्रीच्या सौभाग्य, प्रेम आणि नात्यांच्या बंधनाचे प्रतीक आहे.

गण गौरी निमित्ताने शहरातील महिला भगिनींनी दररोज श्रीराम मंदिर - सुभाष रोड - शिवाजी रोड - एसटी स्टँड - बाजारपेठ ते श्रीराम मंदिर या मार्गाने दररोज मिरवणूक काढून आनंद लुटला. मिरवणुकी दरम्यान मार्गावरील परिवार गणगौर चे पूजन करत असे.

## साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लीना मेहेंदळे

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) नवी दिल्ली येथे आयोजित महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवृत्त सनदी अधिकारी लीना मेहंदळे यांची एकमताने निवड करण्यात आल्याची घोषणा संमेलनाच्या निमंत्रक महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त आर. विमला तसेच स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी यांनी केली. सरहद संस्था, पुणे आणि नवीन महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने हे दोन दिवसीय संमेलन ११ व १२ एप्रिलला होणार आहे. छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीचे औचित्य साधून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.


पाहिजेत

सेल्समन (महिला/ युवती प्राधान्य)

लिरा द कॉस्मेटिक्स झोन

वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर

मो. 7499630747

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME SHAIKH SHAHRUKH AYUB

TO NEW NAME AS SHAHRUKH AYYUB SHAIKH

ADD -NOORAIN MANJIL LAST AREA, NEAR BIGG ELECTRICAL POLE , RAHEMAT NAGAR, AKAR COLONY, JORVE ROAD, SANGAMNER TAL, SANGAMNER DIST, AHEMADNAGAR , 422605

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME ASHIWINI UMESH WADNERE

TO NEW NAME AS ASHWINI UMESH WADNERE

ADD -, SANGAMNER, DIST - AHILYANAGAR, 422605

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME SONAWNAE DEEPAK VILAS (SPOUSE NAME AS PER OLD PASSPORT NO.Y3828055)

TO NEW NAME AS SONAWANE DEEPAK VILAS

VIDE AADHARNO. 5342 6814 5646

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME AKSHA TAJUUDDIN SHAIKH

TO NEW NAME AS AKSA SHAHRUKH SHAIKH

ADD -NOORAIN MANJIL LAST AREA, NEAR BIGG ELECTRICAL POLE, RAHEMAT NAGAR, AKAR COLONY, JORVE ROAD, TAL SANGAMNER, DIST, AHILYANAGAR,422605

पाहिजेत

वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत

वेल्डर

हेल्पर

7972963397






卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐

MALPANI

मालपाणी उद्योग समूह आयोजित

भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,

पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे

सेल्स एक्झीक्युटिव -१ एमबीए असल्यास प्राधान्य

ऑफिस असिस्टंट -१ कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक

कार ड्रायव्हर - १ अनुभव असल्यास प्राधान्य

घरकाम करणारी महिला- १ सर्व घरकाम

अर्जासह समक्ष भेटावे

संपर्क - 9822399371/ 7879708888

त्वरित पाहिजेत

द्वारकादास शामकुमार

सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी

कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ १२ ते ९

9511238422

पाहिजेत

हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत

अकौंटंट - १

कॅशियर - ४

स्टोअर किपर - २

9665022661

8329104856

पाहिजेत

मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे

प्रभात मेडिकल

नवीन नगर रोड, ताजने मला, संगमनेर

9921245753

पाहिजेत

अमुल डेअरी मार्ट कुषी व्हेट दुध यंत्र तयार करणाऱ्या कंपनीसाठी

मार्केटिंग मॅनेजर- ५

ड्रायव्हर- २

टेलिकॉलर (महिला)- ३

हेल्पर - ५

7350628728

पाहिजेत

मार्केटिंगसाठी कॉम्प्यटर्सची माहिती असलेले मुले पाहिजेत

पोर्णिमा एजन्सी नगरपालिकेजवळ, सारिका ड्रेसेस समोर, संगमनेर

7588607008

9890636830

पाहिजेत

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

पाहिजेत

कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१ ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक

अकाउंटंट - ०१ टॅलीचे ज्ञान आवश्यक किमान ०१ वर्षांचा अनुभव

आकर्षक पगार

बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर

8600828485

9511833320

पाहिजेत

मुलगा/ पुरुष कर्मचारी

आकर्षक पगार

श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर

Biodata सह भेटणे

9822283079



दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९ ७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४



वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींची क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी

## तालुकास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

जागतिक महिला दिनानिमित्त एकविरा फाउंडेशनतर्फे आयोजित तालुकास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेत भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे विद्यालयाच्या विजयपरंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. द्वितीय क्रमांकासोबतच संघाला ७,००० रुपयांचे रोख पारितोषिक व आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

संघातील खेळाडूंमध्ये वैष्णवी यरमल (कर्णधार), दूर्वा डोंगरे, भावना पन्हाळे, समृद्धी शहारे, सुप्रिया दंडवते (विकेटकीपर), भक्ती भुसारी, श्रेया तिवारी, गौरी घुले, जिनल मुथा, श्वेता शिंदे, समृद्धी लाड, संस्कृती नरवडे आणि आयेशा यरमल, यांचा समावेश होता. सर्व खेळाडूंनी संघभावना, चिकाटी आणि कौशल्य यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या यशामागे क्रीडा शिक्षक किशोर देशमुख सर, मिलिंद औंटी सर आणि जगन गवांदे सर, यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे विद्यार्थिनींनी स्पर्धेत आत्मविश्वासाने खेळ सादर केला. तालुक्यातील विविध शाळांसह ग्रामीण भागातील शाळांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता, त्यामुळे ही स्पर्धा अत्यंत चुरशीची ठरली.

या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, चेअरमन माजी विधान परिषद सदस्य डॉ. सुधीरजी तांबे, सेक्रेटरी सुमंतजी कोल्हे, आमदार सत्यजित तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष मैथिलीताई तांबे, एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा जयश्रीताई थोरात, खजिनदार ज्ञानेश्वर सांगळे, संचालक बाबा खरात, मुख्याध्यापक एस. एम. खेमनर, उपमुख्याध्यापिका सुरेखा दिघे, पर्यवेक्षिका रणशूर मॅडम, पर्यवेक्षक किशोर देशमुख व अण्णासाहेब दिघे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले.

# ऑनलाइन जुगारावर कारवाई

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशातील वाढत्या बेकायदेशीर ऑनलाइन जुगार आणि सट्टेबाजीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने एका मोठ्या कारवाईत ३०० हून अधिक बेकायदेशीर बेटिंग वेबसाइट्स आणि मोबाइल ॲप्सवर बंदी घातली आहे. केंद्र सरकारच्या या धडक कारवाईमुळे ऑनलाइन जुगार चालवणाऱ्या जाळ्यांचे कंबरडे मोडले असून, डिजिटल माध्यमांतून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला लगाम बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्र सरकारकडून बेकायदेशीर सट्टेबाजींविरोधातील मोहीम गेल्या काही काळापासून सातत्याने राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत ८ हजार ४०० वेबसाइट्सवर कारवाई करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने लागू केलेल्या नवीन 'ऑनलाइन गेमिंग' नियमानंतर ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. या नव्या कायद्याचा आधार घेत प्रशासनाने तब्बल ४,९०० वेबसाइट्स आणि ॲप्स पूर्णपणे ब्लॉक केली आहेत. यामध्ये अनेक परदेशी ॲप्सचाही समावेश असून, जे भारतीय चलनामध्ये सट्टा लावण्यासाठी प्रवृत्त करत होते. सरकारने केलेल्या या कारवाईची व्याप्ती मोठी आहे. यामध्ये प्रामुख्याने ऑनलाइन स्पोर्ट्स बेटिंग प्लॅटफॉर्म्सचा समावेश आहे, जे क्रिकेट, फुटबॉल आणि इतर मोठ्या क्रीडा स्पर्धांवर सट्टा लावण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत होते.

# कर्तव्यावर असताना बस चालक सोमनाथ मधे यांचा मृत्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील साकूर येथील बस कंडक्टर सोमनाथ सुखदेव मधे ( वय ४८) यांचं ड्युटीवर असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. हि घटना शनिवार दि. २१ मार्च रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. संगमनेर - डिग्रस ही बस डिग्रस येथे मुक्कामी होती. सकाळी डिग्रस येथून बस निघायच्या आधी सोमनाथ मधे यांना अस्वस्थ वाटू लागले होते.

यावेळी त्यांना चक्कर आल्याने उलटी झाली. त्यानंतर मधे यांना तातडीने संगमनेर येथील दवाखान्यात दाखल करण्यात आले. मात्र त्यांचा मृत्यू झाला. मधे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी संगमनेर येथील कुटीर रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या घटनेने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मोहन जोशी



मुंबई (वृत्तसंस्था)

गेल्या अनेक दिवसांपासून आरोप-प्रत्यारोपाच्या महानाट्यानंतरही अनेक कारणामुळे गाजलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी अखेर अभिनेते मोहन जोशी यांची निवड झाली. जोशी यांनी अभिनेते व दिग्दर्शक विनय आपटे यांचा दणदणीत पराभव करून दुसऱ्यांदा अध्यक्षपदाचा मान पटकावला.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत मोहन जोशी पुरस्कृत उत्स्फूर्त पॅनेलने व विनय आपटेंच्या परिवर्तन पॅनेलने मुंबई विभागातून प्रत्येकी आठ मते मिळाली होती. माटुंगा येथील यशवंत नाट्य संकुलात नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाच्या झालेल्या बैठकीत मोहन जोशी यांची निवड झाली. जोशी यांना २७ तर आपटे यांना केवळ १२ मते मिळाली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची यंदाची निवडणूक खूपच वादग्रस्त ठरली होती. मतपत्रिका गहाळ होणे, बोगस मतदान होणे त्यानंतर त्यावर तोडगा काढण्यासाठी त्रिसदस्सीय समितीची स्थापनाही करावी लागली होती. मोहन जोशी यांची अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर या महानाट्यावर पडद पडला.

# मारहाण प्रकरणी पाच जणांना अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोतूळ- पंधरा दिवसांपूर्वी दोन कुटुंबात झालेल्या मारहाणप्रकरणी पाच जणांना पोलिसांनी अटक केली आहे. आठ आरोपी अद्यापही फरार आहेत.

शिवजयंतीच्या दिवशी कोतूळ ग्रामपंचायत कार्यालयामागे आतार आडनावाच्या दोन कुटुंबांत मारहाण झाली. परस्परविरोधी तक्रारींवरून दोनही गटांवर गुन्हे दाखल झाले आहेत. या घटनेत जुबेर अब्दुल आतार याला लोखंडी रॉडने मारहाण झाल्याने तो प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल होता. फिर्यादी आलिया जुबेर आतार हिच्या फिर्यादीनुसार एकूण १३ जणांनी त्यांच्या, राहत्या घरात येऊन हल्ला केला. यात सना मुसा आतार, अब्दुल आतार, जुबेर व मुसा तसेच वृद्ध महिला जुलेखा जखमी आहेत. पोलिसांनी दिनांक १६ ते २० मार्चदरम्यान अश्फाक अन्वर आतार, शहारुख इब्राहिम आतार, इरफान मुबारक मनियार, मुस्ताक अन्वर आतार, साहिल अन्वर आतार यांना अटक केली आहे.

# काबूलवर हवाई हल्ला


## शेकडो नागरिकांचा मृत्यू, भारताकडून तातडीची मदत

मुंबई (वृतत्संस्था)

इराण आणि अमेरिका यांच्यात युद्ध पेटलेले असताना दुसरीकडे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातही मोठा संघर्ष बघायला मिळत आहे. पाकिस्तानने केलेल्या अफगाणिस्तानवरील हल्ल्यात ४०० लोकांचा जीव गेला. इराण आणि अमेरिका युद्धाचा आज २० वा दिवस आहे. या युद्धामुळे संपूर्ण जंग संकटात आहे. मात्र, पाकिस्तानचे काही वेगळेच सुरू आहे. पाकिस्तानमध्येही कच्च्या तेलाची मोठी कमी आहे. लोकांना गॅस मिळत नाहीये. मात्र, अफगाणिस्तानवर मोठे हल्ले पाकिस्तानकडून केली जात आहेत. अफगाणिस्तानने ही पाकिस्तानच्या प्रमुख हवाई लष्कर तळांना टार्गेट करत हल्ला केला. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील तणाव काही कमी होण्याचे नाव घेत नाहीये. पाकिस्तानकडून मोठा हवाई हल्ला अफगाणिस्तानमध्ये करण्यात आला. दहशतवादी अड्डा समजून पाकिस्तानने एका रूग्णालयावर हल्ला केला. या हल्ल्यात ४०० पेक्षाही अधिक निर्दोष लोकांचा जीव गेला. अफगाणिस्तानकडून या हल्ल्याचा बदला घेण्याचा थेट मोठा इशारा देण्यात आला.कोणत्याही परिस्थितीमध्ये सोडले जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात गेल्या काही दिवसांपासून प्रचंड तणाव बघायला मिळत आहेत. यादरम्यानच या वाईट स्थितीतभारत अफगाणिस्तानच्या मदतीला धावून गेला आहे. भारतातून मोठी मदत अफगाणिस्तानमध्ये पाठवण्यात आली. भारत आणि अफगाणिस्तानमधील संबंध कायमच चांगले राहिले.काबुलमध्ये पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या विनाशानंतर भारताने अफगाणिस्तानमध्ये २.५ टन आपत्कालीन वैद्यकीय मदत पाठवली आहे. यामध्ये काही गोळ्या, मेडिकल डिस्पोजेबल किट आणि काही वैद्यकीय उपकरणे देखील आहेत.

# डॉ. एस. जी. सातपुते यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## सेवाभावाचा तेजस्वी दीपस्तंभ



संगमनेरच्या वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने अढळ स्थान निर्माण करणारे ज्येष्ठ व सेवाभावी वैद्यकीय व्यक्तिमत्त्व डॉ. सोमनाथ सातपुते यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या जाण्याने शहराने केवळ एक कुशल डॉक्टरच नव्हे तर समाजासाठी आयुष्य समर्पित केलेला एक खरा सेवाधर्मी माणूस गमावला आहे.

संगमनेरमध्ये आधुनिक वैद्यकीय सुविधा अत्यल्प असलेल्या काळात त्यांनी आपल्या वैद्यकीय सेवेला सुरुवात केली. अत्यंत साध्या दवाखान्यातून सुरू झालेला त्यांचा प्रवास पुढे हजारो रुग्णांच्या विश्वासाचा आधार बनला. केवळ स्टेथोस्कोप, सूक्ष्म निरीक्षण आणि दीर्घ अनुभव यांच्या आधारे ते अचूक निदान करत असत. अनावश्यक तपासण्या किंवा विनाकारण उपचार सुचवणे त्यांच्या स्वभावात कधीच नव्हते. त्यामुळेच त्यांच्या दवाखान्यात सकाळपासून रुग्णांची मोठी गर्दी असायची आणि अनेक कुटुंबांचा त्यांच्यावर अपार विश्वास होता.

डॉ. सातपुते यांनी आपली सेवा केवळ शहरापुरती मर्यादित ठेवली नाही. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेची निकड ओळखून ते अनेकदा खेड्यापाड्यांत जाऊन रुग्णांची तपासणी करत असत. गरीब आणि गरजू रुग्णांची मोफत तपासणी करणे, तसेच स्वतःच्या खर्चातून औषधे उपलब्ध करून देणे ही त्यांची सेवाभावी वृत्ती समाजासाठी प्रेरणादायी ठरली. त्यामुळेच अनेकांच्या दृष्टीने ते केवळ डॉक्टर नव्हते, तर समाजाच्या वेदना जाणणारे आणि त्यावर औषध ठेवणारे खरे अर्थाने देवमाणूस होते.

वैद्यकीय क्षेत्रातील कार्यासोबतच संगमनेरच्या सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीतही त्यांचे मोलाचे योगदान राहिले. विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेत आणि कार्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. अनेक संस्थांमध्ये कार्यकारी सदस्य, सचिव आणि उपाध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडल्या. सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्था , शिक्षण प्रसारक संस्था यांसारख्या संस्थांमध्ये त्यांनी उपाध्यक्ष पदावर काम केले. अगदी मागील वर्षापर्यंतही त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तपासणीचे उपक्रम उत्साहाने राबवले. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि शिस्तबद्ध जीवनशैली ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. साधेपणा शांत स्वभाव आणि समाधानाचा भाव यांमुळे समाजातील सर्व स्तरांमध्ये त्यांना मोठा आदर आणि प्रेम लाभले.

मूल्ये जपणारी आणि समाधानाने जगणारी एक पिढी हळूहळू आपल्यातून निघून जात आहे. त्या पिढीतील एक तेजस्वी दीपस्तंभ म्हणून डॉ. सातपुते यांची ओळख कायम राहील. त्यांच्या स्पर्शात जणू औषध होते- त्यांच्या एका इंजेक्शनने अर्धमेला रुग्णही बरा होताना पाहण्याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. खऱ्या अर्थाने धन्वंतरीची उपासना करणारा हा सेवाधर्मी वैद्य आज आपल्यात नाही ही भावना संगमनेरकरांच्या मनाला वेदना देणारी आहे. मात्र नियतीचा निर्णय मान्य करण्याशिवाय पर्याय नसतो.

रुग्णसेवेचा आदर्श, समाजासाठी समर्पित आयुष्य आणि साधेपणातून घडलेले महान व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. एस. जी. सातपुते यांची स्मृती संगमनेरच्या जनमानसात सदैव जिवंत राहील. त्यांच्या कार्यातून आणि मूल्यांमधून अनेक पिढ्यांना प्रेरणा नक्कीच मिळत राहील.

**–प्रा. नितिन रघुनाथ नवले**
**सह्याद्री ज्युनिअर कॉलेज, संगमनेर**

# अपूर्वा गेठे - शेळके यांना पीएच. डी. प्रदान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील अपूर्वा गेठे - शेळके यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या वतीने उद्यानविद्या (फळशास्त्र) या विषयात दि. १५ मार्च २०२६ रोजी झालेल्या ३९ व्या दीक्षांत समारंभात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी आपले पीएच. डी. चे संशोधन महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे केले पूर्ण असून, Morphological and Biochemical Characterization of Different Guava Genotypes या संशोधन विषयावर प्रबंध सादर केला होता. या प्रबंधामुळे पेरू पिकाच्या संशोधन क्षेत्रात मोलाची भर पडली.

या संशोधनासाठी कृषी महाविद्यालय, धुळे येथील त्यांचे संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. सुनील पाटील यांचे अनमोल मार्गदर्शन त्यांना लाभले. तसेच संशोधन कार्यासाठी उद्यानविद्या विभागप्रमुख डॉ. भरत पाटील, शैक्षणिक प्रभारी डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर, डॉ. सचिन मगर, डॉ. सतीश जाधव, डॉ. अनिल काळे, डॉ. महेश पाटील व कृषिविद्या विभागाचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र गेठे यांचे मौल्यवान सहकार्य लाभले. याशिवाय संशोधनाच्या विविध टप्प्यांवर त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे संशोधन कार्य अधिक प्रभावीपणे पूर्ण होण्यास मदत झाली.

# लोकोपयोगी नवकल्पना

आपण दररोज इनोव्हेशन, नवोन्मेष, नवनिर्मिती, नवकल्पना हे शब्द वाचतो, ऐकतो. सध्याचं युग हे नवकल्पनांचं आहे असं वारंवार नेते आणि इतर व्याख्याते आपल्या भाषणांतून सांगत असतात. ते खरंही आहे पण त्या दृष्टीनं प्रयत्न संस्थांकडून आणि शासनाकडून होत नाहीत असा माझा अनुभव आहे. मी याउलट चीनमध्ये पाहिलं. म्हणूनच तो देश आघाडीवर आहे.

नवकल्पनांसाठी अचाट बुद्धिमत्तेची आवश्यकता नसते. साधी माणसंही छान नवकल्पना निर्माण करू शकतात / करतात. एका मोठ्या कंपनीत मी नवकल्पना प्रमुख म्हणून काम करत असताना हे पाहिलेलं आहे. एका ऑटो इलेक्ट्रिशियननं मोटरगाडी चोरीला जाऊ नये म्हणून विलक्षण नवकल्पना प्रस्तुत केली होती. गाडीत गुप्त ठिकाणी सिमकार्ड चिकटवून मोबाइलद्वारे चोरीला गेलेली गाडी बंद करण्याचं प्रात्यक्षिक त्यानं मला दाखवलं होतं. दुर्दैवाने त्याला पेटंट मिळू शकलं नाही कारण तसं एक उत्पादन बाजारात उपलब्ध होतं.

नवकल्पनेच्या मुळाशी मात्र भक्कम वैज्ञानिक तत्त्व हवं. नाहीतर अनेक वर्षांपूर्वी रामार पिल्ले यानं स्वस्तातलं 'हर्बल पेट्रोल' बनवल्याचा बनाव केला होता तसं व्हायचं. महत्त्वाची गोष्ट ही की कधी कधी दोन-तीन वेगवेगळ्या कल्पना एकत्र करून उपयुक्त नवकल्पना साधता येते. माझ्या एका नवकल्पनेनं मला पेटंटही मिळवून दिलं. मात्र आता मी पेटंटच्या भानगडीत न पडता माझ्या नवकल्पना खुशाल शेअर करतो. ज्यांना स्वारस्य असेल त्यांनी अवश्य त्या कल्पनांचा व्यावसायिक फायदा घ्यावा. काही नवकल्पना मी इथे शेअर करतो. पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. स्कूटरवरून जाताना खिशातला मोबाइल हळूहळू सरकत बाहेर आला आणि रस्त्यावर पडला. नशीब बलवत्तर म्हणून त्यावरून वाहनाचं चाक गेलं नाही आणि तो वाचला.



त्या काळच्या मोबाइलना एका कोपऱ्यात बारीकसं भोक असे. तसंच कंपन्यांमध्ये प्रवेश करताना स्वाइप कार्ड वापरावं लागे. या कार्डाला ताणली जाणारी एक वादी लावलेली असायची. मी ही वादी घेतली आणि ती मोबाइलला भोकाद्वारे जोडली. दुसऱ्या टोकाला असलेली क्लिप विजारीच्या पट्ट्याच्या लूपला अडकवली. खिशातून मोबाइल पडणं बंद झालंच शिवाय तो बांधलेला असतानाच कानाला लावणं सहज शक्य होतं. अनेकांनी माझ्याकडून ही जोडणी करून घेतली.

इस्त्रीशिवाय कपड्याला इस्त्रीसमान इफेक्ट यावा म्हणून काहीतरी केलं पाहिजे असं एकदा माझ्या मनात आलं. इथे इस्त्रीच्या वापरातलं वैज्ञानिक तत्त्व लक्षात घेतलं पाहिजे. मुळात आपण जास्तकरून सुती म्हणजे कॉटन कपड्यांना इस्त्री करतो. कॉटन म्हणजे सेल्युलोज. सेल्युलोज ग्लुकोजच्या अनेक अणूंच्या शृंखलेनं बनला असल्यानं त्याचा धागा मोठ्या प्रमाणात पाणी शोषून घेतो. यामुळे धाग्याची लांबी वाढते आणि कपडा ढिला तसंच सैलसर होतो. तो सपाट पृष्ठभागावर ठेवून गरम इस्त्री कपड्यावरून फिरवली की धागा पाणी निघून गेल्यामुळे आक्रसतो आणि सपाट पृष्ठभागावर दाबल्यामुळे ताठ राहतो. हे इस्त्रीच्या वापरामागचं तत्त्व आहे. मी प्लॅस्टिक नळ्यांच्या साह्यानं एक फ्रेम तयार केली आणि त्यात टी-शर्ट अडकवल्यावर फ्रेमच्या काही नळ्या सरकवून फिक्स करता येतील अशी योजना केली. यामुळे धुतलेला ओला टी-शर्ट फ्रेमवर ताठ बसतो, लवकर वाळतो आणि इस्त्री केलेल्या कपड्याप्रमाणेच त्याचं कापड ताठ आणि सपाट राहतं. मी अनेक वर्षं या साधनाचा वापर केला आहे. या साधनाच्या वापराला कोणताही खर्च नाही, ऊर्जाही लागत नाही आणि इस्त्रीसारखा यात कोणताही धोका नाही.

डासांपासून संरक्षण मिळवण्याठी जे काही उपाय उपलब्ध आहेत त्यात चांगला आणि आरोग्यदायी उपाय नाही असं लक्षात आलं. अभ्यासात असं समजलं की डासांना काही वनस्पतिजन्य पदार्थांचा तिटकारा आहे. वनस्पतिजन्य (बहुतांश सुगंधी) तेलांचा वापर करून मी हर्बल स्प्रे बनवला. याचा वास अतिशय मनोहारी असून उघड्या अंगाला चोपडल्यास पाच-सहा तास तिथे डास चावत नाहीत. अनेकांनी वापरून उत्तम अभिप्राय दिले आहेत.

माझ्या एका मित्राकडे पाळीव माशांचा टँक आहे. माशांना जीवित राहण्यासाठी पाण्यातून हवेचे बुडबुडे सतत सोडणं अत्यावश्यक असतं. हे काम एका इलेक्ट्रिक पंपाच्या साह्यानं होतं. काही कारणानं त्याचा इलेक्ट्रिक पंप नादुरुस्त झाला. दुरुस्तीला विलंब लागणार होता. माशांचं जीवित धोक्यात आलं. त्यानं मला विचारलं की त्वरित काय उपाय करता येईल? मी एक प्लॅस्टिकची बाटली बारीक भोकं पाडून टँकच्या तळाशी टेपनं चिकटवायला सांगितलं. लगेचच बाटलीच्या भोकांमधून बुडबुडे येऊ लागले. काम फत्ते. बाटली पाण्यानं भरली की अशीच दुसरी बाटली लावायची. तात्पुरताच नव्हे तर त्याला हा कायमचा उत्तम उपाय मिळाला. याशिवाय अशा बाटल्यांचा वापर ड्रिप इरिगेशन प्रकारे काही दिवस सुटीवर जाताना बागेतील झाडांना पाणी देण्यासाठीही करता येतो. मी तर एका रुग्णालयात जाऊन वापरलेल्या ड्रिपचा या कामासाठी पुनर्वापरही केला आहे. दक्षिण-पूर्व देशात काही लोकांनी रिकाम्या बाटल्यांचा वापर करून तराफे बनवले आहेत.

नवकल्पनांवर व्याख्यान देत असताना मी अनुलंब कृषी म्हणजे **"Vertical Farming'**चा पुरस्कार करतो. आपल्याकडे अनधिकृत उंच इमारतींचे खूप सांगाडे (structures) धूळ खात पडलेले आहेत. ते पाडून टाकण्याऐवजी कृषीच्या नवकल्पित योजनेसाठी उपयोगात आणता येतील. यामुळे अन्नधान्याचा प्रश्न सोडवता येईल. हायड्रोपोनिक्स तत्त्वानं शेती केल्यास वैराण प्रदेश अतिशय कमी पाण्यात भाज्या पिकवून हरित करता येईल. अशा अनेक नवकल्पना आपल्या देशाच्या विकासाकरता महत्त्वाच्या ठरू शकतील.

मला प्रश्न केला जातो की भारतीय नवकल्पना का फार पुढे जात नाहीत? याला शासनासह इतर संस्थांची उदासीनता तसंच प्रारूपं जुगाड पद्धतीची बनवली जात असल्यानं आकर्षक वाटत नाहीत ही मुख्य कारणं आहेत. परिस्थिती सुधारेल अशी आशा करूया.

**श्रीनिवास शारंगपाणी**
पुणे-४११०३०
भ्रमणध्वनी: ९२२५६३६३५३
ई-मेल: shrisharang@hotmail.com

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................... 05
सेल्सगर्ल.................... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# सत्यशोधक विचारमंच आयोजित व्याख्यान


ॲड. वर्षाताई देशपांडे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सत्यशोधक विचारमंचाच्या वतीने 'व्याख्यान पुष्प' मालिकेतील तिसरे व्याख्यान रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा विषय महिला सक्षम असतातच... असा असून, समाजातील महिलांच्या सक्षमीकरणावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रख्यात महिला हक्क कार्यकर्त्या व संयुक्त राष्ट्र संघ पुरस्कार प्राप्त व्याख्यात्या ॲड. वर्षाताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. त्यांनी देश-विदेशात महिलांच्या हक्कांसाठी केलेल्या कार्यामुळे त्यांना विशेष ओळख मिळाली असून, त्यांच्या विचारांमधून महिलांच्या स्वावलंबनाचा आणि अधिकारांच्या जाणीवेचा वेध घेतला जाणार आहे.

सदर व्याख्यान संगमनेर येथील व्यापारी असोसिएशन हॉल, जोशी हॉटेल मागे, पडतानी कॉम्प्लेक्स येथे पार पडणार आहे. या व्याख्यानातून महिलांच्या क्षमतांचा, त्यांच्या सामाजिक सहभागाचा तसेच आजच्या काळातील आव्हानांचा उहापोह करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास महिलांसह सर्व नागरिकांनी उपस्थित राहून विचारप्रवर्तक मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सत्यशोधक विचारमंचाच्या वतीने करण्यात आले आहे. पहिले पुष्प संपादक संजय आवटे, दुसरे पुष्प ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश महाराव यांनी गुंफले होते.



संगमनेर - संगमनेर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व विविध संस्थांचे आधारवड असलेले कै. डॉ. सोमनाथ सातपुते यांना विविध राजकीय पक्ष व संस्थांच्यावतीने अभिवादन करण्यात आले. जिल्हा बँक सभागृहात झालेल्या शोकसभेत माजी मंत्री बाळासाहेब थोरात, उद्योजक राजेश मालपाणी, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहून डॉ. सोमनाथ सातपुते यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल आदरभाव व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

# संगमनेरात रमजान ईद सण उत्साहात साजरा

(युवावार्ता) संगमनेर -

मुस्लिम समाजाचा पवित्र सण असणारा रमजान ईद सण आज शनिवारी सर्वत्र उत्साहात साजरा झाला. संगमनेरात पेटिट बीएड जवळील ईदगा व विविध मशिदीमध्ये नमाज अदा करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आ. सत्यजित तांबे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या सह अनेक मान्यवरांनी सय्यदबाबा चौक येथे उपस्थित राहून नागरीकांना शुभेच्छा दिल्या. या निमित्ताने सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला.

छाया - विलास चिवडे



# खरात प्रकरणात सत्य समोर येईलच : ना. विखे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर :- कथित कॅप्टन अशोक खरात यांच्या मंदिराच्या ट्रस्टमधील कोणी दोषी असेल तर त्यांची चौकशी झाली पाहिजे. यात पोलिसांनी काही व्हिडीओ जप्त केले आहेत. त्यात कोणत्या व्यक्ती आहेत याचीही माहिती पोलिस घेतील. मात्र धर्माच्या नावाखाली समाजाचे शोषण अत्यंत क्लेशदायक आहे असे मत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले.

संगमनेर येथे माध्यमांशी बोलताना विखे पाटील म्हणाले, की समाजव्यवस्थेमध्ये ही विकृती आहे. त्याने कोणाची कशी फसवणूक केली, कोणाच्या संपत्ती बळकावल्या हे सर्व तपासातून समोर येईल. यासाठी मुख्यमंत्र्यांनी सक्षम पोलिस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष समिती नेमली आहे. त्यांच्या सखोल चौकशीतून सत्य समोर येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान वडगावपान येथील आरोपीचा शोध पोलिस अजूनही घेत आहेत. शाळेच्या गेटवर सीसीटीव्ही आहेत की नाही हासुद्धा प्रश्न आहे. गावातील काही व्यक्तीना ताब्यातही घेतले होते. पण काही निष्पन्न झाले नाही. तपासाबाबत पाठपुरावा सुरू आहे, असेही विखे पाटील म्हणाले. आता सर्वच ग्रामपंचायतींनी गावामध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी पुढाकार घ्यावा असेही त्यांनी सूचित केले. अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याधिकाऱ्यांना पंचनाम्यांच्या सूचना दिल्या असून, मदतीचा निर्णय प्रशासन पातळीवर होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# अकोले तालुक्यात अवकाळीने मोठे नुकसान शेतकऱ्यांची शासनाकडे मदतीची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील आदिवासी भागात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे सरासरी ५० ते ५५ टक्के उत्पन्न घटले असून ते आर्थिक संकटात सापडले आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आदिवासी भागातील कार्यकर्ते व शेतकऱ्यांनी दिला आहे.

या संदर्भात आदिवासी शेतकऱ्यांनी आदिवासी सहकारी महामंडळ नाशिकचे व्यवस्थापकीय संचालक यांना निवेदन दिले. सदर निवेदनात म्हटले आहे, की महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ राजूर यांच्या माध्यमातून भात खरेदी सुरू असली तरी शेतकरी सततच्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे मेटाकुटीस आला आहे. भात खरेदीसाठी हेक्टरी ३०,००० ते ३५,००० रुपये बोनस जाहीर करावा, बाळहिरडा ३०० ते ३५० रुपये दराने खरेदी करावा, पुढील वर्षी (२०२५-२६) भाताला हमीभाव देत ४,००० ते ४,५०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी करावी, डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाचे भात मुख्य पीक असून उत्पन्नही अत्यल्प असल्यामुळे मुलांचे शिक्षण, घरखर्च तसेच आरोग्याचा खर्च भागवणे कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने प्रशासनाने तातडीनेआर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी अनंत घाणे, भरत घाणे, बाजीराव सगभोर, मारुती खाडे, देविदास भागडे, दीपक भागडे, अजित कडाळी, समीर मुठे, मधुकर खाडे, अंकुश भवारी, एकनाथ खाडे, काशिनाथ घाणे, गणपत खाडे, लक्ष्मण घोडे, वाल्मिक खाडे, लक्ष्मण भागडे आदिंनी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. याशिवाय आयुक्त व अप्पर आयुक्त पावरा यांनाही डांगी गायींच्या संवर्धनाबाबत निवेदन दिले आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees - 3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25